# मिरा भाईदर महानगरपालिका

मिरा भाईदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १८/०४/२०१८ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|
| ५. श्री. जुबेर इनामदार मा. सदस्य यांनी दि. ३०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मा. महासभा दि. 30/07/2010 प्रकरण क्र. 26 ठराव क्र. 32 1966 चे कलम 37 अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा विषय मंजुरीसाठी शासन दरबारी पाठविला होता त्या वर शासनाने काय कारवाई केली आहे ? | | मा. महासभा दि.30/07/2010 प्रकरण क्र. 26, ठराव क्र. 32, 1966 चे कलम 37 अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा विषय मंजुरीसाठी शासनाकडे पाठविलेला असून शासन स्तरावर प्रलंबित आहे. त्यानंतर विकास हक्क प्रमाणपत्राबाबत शासनाने दि.29/01/2016 रोजी अधिसुचना पारित केलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. |
| अ) तत्कालीन आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांनी दि. 22/02/2011 रोजी जावक क्र.मनपा / सा.बा./8830/2010-11 अन्वये श्री. जयेश शहा (रवि डेव्हलपर्स) यांना सिमेंट कॉक्रीटचे रस्ते विकसीत करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीच्या कोणत्या नियमांना अधिन राहुन कार्यादेश दिले ? | | मे. रवि डेव्हलपमेंट यांना सिमेंट कॉंक्रीट रस्ते बनविणेसाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. |
| ब) मिभामनपा सार्वजनिक बांधकाम विभागाने वरील विषया ह्यांचे दिनांक 24/09/2014 रोजी विधी विभागाला अभिप्रायसाठी पत्र सादर केले. त्याला अनुसरुन विधी विभागाच्या अभिप्राय वर मनपाने काय निर्णय घेतला ? | | सदर विषय महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे. |
| क) मे. रवि डेव्हलपर्स (श्री. जयेश टी. शहा) व इतर सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. 158/2, 159, 156/2, 154/2, 152/2, 81/1,2,3/पै, 5,6, 85/1, 27/1, 10अ, 28/5, 29/3, 27/2, 72/2, 73/1,2,3,4 74/1,2, 75/1, 79/1,2,3 4,88/1/1, 89/1,3, 225/पार्ट, 435, 436, 437/1 ते 3,5 ते 11, 438/1 ते 3,5 439/1पै, 6,8, 40/1,2,3 ते 8,11,12,13, 444/5, 443/1पै, 443/2पै, 418/3,4 444/1,3, 418/2, 409/3, 396/7 मौजे मिरा/ घोडबंदर/ नवघर हे जमीन मालक आहेत, पट्टाधारक किंवा अधिका पत्रधारक आहे. | | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना रस्ते, सिमेंट कॉंक्रीटीकरणाव्दारे विकसित करणेसाठी मे. रवि डेव्हलपमेंट यांना महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेले असून दर्शविलेले भुखंड/ विकास योजना रस्त्याचे 7/12 धारक यांनी करारनामे करून मे. रवि डेव्हलपमेंट यांना विकसीत करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहे. |
| ड) मे. रवि डेव्हलपर्स यांनी मनपाचे ठरवुन दिलेल्या सिमेंट कॉक्रीट रस्ते विकसीत करण्यासाठी दिलेल्या कार्यादेशातील तपशीला नुसार नसल्याचे व केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याने WAPCOS लि. यांने दि. 04/01/2013 रोजीच्या पत्रान्वये मनपाला सुचित केले. तसेच मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. 5509 /2012 मे. रवि डेव्हलपर्स केलेले काम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने प्रतिज्ञापत्राद्वारे मनपा शहर अभियंता यांनीही सादर केले आहे. | | सदर बाबतीत महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही झालेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| इ) मे. रवि डेव्हलपर्स ह्यांनी मनपाचे त्रयस्थ पक्ष WAPCOS लि. ह्यांनी सादर केलेल्या अहवालाला चुकीचे ठरविणारे अन्य त्रयस्थ पक्ष यांचा तांत्रिक अहवाल सादर करुन सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते विकसीत करण्याचे मोबदला म्हणुन विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची मागणी केली. असे असता, चुकीचा अहवाल सादर करणाऱ्या त्रयस्थ पक्ष WAPCOS लि. ह्यांना मनपा प्रशासनाने काळया यादीत का टाकले नाही | | |
| ई) मिरा भाईंदर महानगरपालिकेने मे. रवि डेव्हलपर्स पार्टनर (श्री. जयेश टी. शहा) यांना प्रदान केलेले विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 517/2015 व 530/2016 प्राप्त केल्यानंतर त्याने त्यांची किती अनधिकृत बांधकाम अधिकृत करुन घेतली आहेत? | | मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेतील मौजे नवघर / घोडबंदर या परिसरातील मंजूर रेखांकन दर्शविलेले विकास योजना रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकरण करुन विकसीत करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मे. रवी डेव्हलपमेंट यांना कार्यादेश दिलेले असून त्याप्रमाणे मे. रवी डेव्हलपमेंट यांनी विकसीत केलेल्या कॉंक्रीट रस्त्यापैकी भागशः क्षेत्रासाठी महानगरपालिकेने विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 517 व 530 अन्वये विकास हक्क प्रमाणपत्र विकासकास दिलेले आहे. उर्वरीत क्षेत्रासाठी विकास हक्क प्रमाणपत्र देणे बाकी आहे. सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे मे. रवी डेव्हलपमेंट यांनी विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 517 व 530 मधील क्षेत्राचा वापर करुन अनधिकृत बांधकाम नियमाकूल केलेले नाही.<br>तथापि विकासक मे. रवि डेव्हलपमेंट यांनी त्यांचेमार्फत करणेत आलेली मंजूरी व्यतिरिक्तची अनाधिकृत बांधकामे नियमाकूल करणेसह सुधारित परवानगी मिळणेसाठी मौजे घोडबंदर 1) स.क्र.81/1,2,3पै.,5,6; 2) स.क्र.27/8,9, 3) स.क्र.27/1, 10अ, 2, व स.क्र.28/5, 29/3, 4) स.क्र.83/1,2; 85/1/1अ, 5) स.क्र.86/1,3,4,8अ,8ब,8क व स.क्र.87/1अपै., 1ब,1क,1ड,2 व स.क्र.88/1/1, 1/3, स.क्र.89/1,3, स.क्र.105/1,2, स.क्र.225पै. 6) स.क्र. 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 75/1, 79/1,3,4, 7) स.क्र.82 यासह नव्याने समाविष्ट स.क्र.26/1,2; 27/3,5,6,7,10ब; 28/1,2पै.,3पै.,29/1; 30/7पै.8पै.,; 41/1,4अ,; 43/2,4,5,6; 55/2; 56/8; 63/1,2,3, 4,6ब,7,8,9; 64/1,2,3,4; 67/1,2; 68/1,2,3; 70/1,2; 71/1,2; 72/1,2; 75/2,; 81/4ब; 86/2; 224/1क; 225/1क,; 226/1,2; 228/1ब,3; 232/1अ,1ब,1क,2अ,2ब; 234/1 व मौजे नवघर मधील स.क्र./हि.क्र. 1) स.क्र.92पै.,93, 94, 95पै., (जुना स.क्र.430 पै., 431, 432, 433पै.,), 2) स.क्र.128 (जुना 444/5), 3) स.क्र.127 (जुना 443)/1पै., 1पै., 4) स.क्र.106 (जुना 419), 116(420)/1,2,3; 117(जुना 421)/1,2,3अ,3ब,4,5,6, 103(जुना 422)/1,3पै. ,4,5,6,7,8, 9,10,11, 105(जुना 423)/2,3,4,5पै., 5पै., 5पै., 5) स.क्र. 96(जुना 429)/2, 6) 96(जुना 429)/5, 7) 435पै., 436/2, 437/1 ते 11, स.क्र.438/1 ते 3, 439/1 ते 6,8; 440/1,3 ते 8,11,12,13; 8) 127(जुना 443)/2पै., 128(जुना 444)/1,3, 126(जुना 418)/2,3,4, 124(जुना 417)/7, 9) 130(जुना 446)/1पै., 10) स.क्र. 447 (जुना 142)/4, 11) स.क्र. 129(जुना 445), 130(जुना 446)/3, तसेच नव्याने समाविष्ट स.क्र. 105 (जुना 423)/1, 98(जुना 428)/3, 96(जुना 429)/1,3; 95(जुना 430)/1, 107(जुना 436)/3, 115(जुना 442)/1 ते 5ब, 130(जुना 446)/2, 142(जुना 444)/4, 447/3,5 या एकत्रित जागेसाठीचा प्रस्ताव सादर केलेला होता. सदर प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी पत्र |

| | | |
|---|---|---|
| | | क्र.मनपा/नर/1715/2017-18 दि.29/07/2017 अन्वये नामंजूर करणेत आलेला आहे. |
| ०६. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. १७/०२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे लावण्यात येत असलेल्या विशेष स्वच्छता कर. | | |
| अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे कधी विशेष स्वच्छता कर लावण्यात आला? | | सन २००१-०२ ते सन २०१०-११ |
| ब) त्यानंतर प्रत्येक वर्षी किती स्वच्छता कर लावण्यात आला? | | सन २००१-०२ ते सन २०१०-११ या कालावधी करीता एकूण ७६३.०० लक्ष मागणी निश्चित करण्यात आली आहे. |
| क) विशेष स्वच्छता कर कुठे खर्च करण्यात आला? | | मालमत्ता कर विभागाकडून मा. महासभेत पारित केलेल्या निर्णयानुसार मालमत्ता कराची आकारणी करुन मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही करण्यात येते. तद्नंतर जमा केलेली रक्कम लेखा विभागामार्फत महानगरपालिका फंडात जमा केली जाते. त्यामुळे सदरची माहिती लेखा विभागाकडून प्राप्त करुन घेणेस विनंती असे. |
| २) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे चालविणेत येत असलेल्या परिवहन सेवेबाबत. | | |
| अ) पालिकेचा अर्थसंकल्प २०१७-१८ यासाठी किती तरतुद होती? | | महापालिकेच्या परिवहन अर्थसंकल्पात सन २०१७-१८ च्या वर्षासाठी महसुली/भांडवली/असाधारण खर्चासाठी एकूण रु. ८०.३७ कोटी इतकी तरतुद केली होती. |
| ब) पालिकेने किती खर्च केला? | | एप्रिल २०१७ ते फेब्रुवारी २०१८ पर्यंत एकूण रु. १८.३३ कोटी इतका खर्च झालेला आहे. |
| क) किती बसेस पालिकेला मंजूर झाल्या? | | केंद्र शासनाच्या JnNURM-II योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेसाठी एकूण ९० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेसपैकी ४८ बसेस ताब्यात घेवून मार्गस्थ करण्यात आलेल्या आहेत. तसेच १० बसेस ताब्यात घेऊन RTO Registration ची प्रक्रिया सुरु आहे. सद्यस्थितीत एकूण ५८ बसेस मनपाच्या ताब्यात आहेत. |
| ड) किती बसेस सध्या चालु आहेत? | | सध्या महानगरपालिका शहरांतर्गत व शहराबाहेर एकूण १४ बस मार्गावर ३५ ते ३६ बसेस चालू आहेत. |
| ३) मिरा भाईंदर महानगरपालिका विधी विभाग | | |
| अ) पालिकेच्या पॅनेलवर किती व कोणते वकील आहेत? | | महानगरपालिकेच्या अभियोक्ता पॅनेलवर कार्यरत असलेल्या अभियोक्ते यांची यादी खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |

| अ.क्र. | अभियोक्त्याचे नाव | मा. न्यायालय |
|---|---|---|
| १ | ॲड. विनय नवरे | मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली |
| २ | ॲड. नारायण बुबना | मा. उच्च न्यायालय, मुंबई |
| ३ | ॲड. मयुरेश लागु | मा. उच्च न्यायालय, मुंबई |
| ४ | ॲड. आशिष गोगटे | मा. न्यायालय, ठाणे, |
| ५ | ॲड. विणा धोंडे | मा. न्यायालय, ठाणे |
| ६ | ॲड. सुजाता सावंत(कांबळे) | मा. न्यायालय, ठाणे |

<table>
<tr><td></td><td></td><td>
<table>
<tr><td>७</td><td>ॲड. प्रशांत कोरगावकर</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td></tr>
<tr><td>८</td><td>ॲड. राजश्री बनसोड</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td></tr>
</table>
तसेच इतर विविध न्यायालयांमध्ये वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या प्रकरणांमध्ये मा. आयुक्त यांच्या मान्यतेने अभियोक्ते यांची नियुक्ती करण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>ब) पालिकेने सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ (आजपर्यंत) किती खर्च केला?</td><td></td><td>सन २०१५-१६, १६-१७ व १७-१८ या आर्थिक वर्षामध्ये विधी विभागामार्फत खर्च झालेल्या रक्कमेची माहिती खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वर्ष</th><th>खर्च झालेली रक्कम</th></tr>
<tr><td>१</td><td>२०१५-१६</td><td>२८,९८,०९२/-</td></tr>
<tr><td>२</td><td>२०१६-१७</td><td>३४,०४,६७२/-</td></tr>
<tr><td>३</td><td>२०१७-१८</td><td>४१,२६,२६४/-</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>क) पालिकेचे वकील कोणकोणते खटले लढले व किती व कोणत्या खटल्यांमध्ये पालिकेच्या बाजुने निकाल लागले?</td><td></td><td rowspan="2">मिरा भाईंदर महानगरपालिकेसंदर्भात विविध मा. न्यायालयांमध्ये दाखल न्यायप्रविष्ठ प्रकरणांची (प्रलंबित व निकाली) मा. न्यायालय निहाय तसेच वर्षनिहाय यादी (सन २०१५ ते २०१८ आजतागायत) या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>ड) पालिकेचे वकील कोणकोणते खटले लढले व किती व कोणत्या खटल्यांमध्ये पालिकेच्या विरोधात निकाल लागले?</td><td></td></tr>
<tr><td>४) मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभाग</td><td></td><td></td></tr>
<tr><td>अ) या विभागाचे प्रमुख कोण आहेत?</td><td></td><td>श्री. राजकुमार एम. घरत (प्र. सिस्टीम मॅनेजर)<br>श्री. विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मु.) मिरा भाईंदर महानगरपालिका</td></tr>
<tr><td>ब) या विभागातर्फे कोणकोणती कामे केली जातात?</td><td></td><td>या विभागात संगणक व इतर सामुग्री यांचा साठा रजिस्टर नोंद करणे. मालमत्ता कर वसुली काऊंटर, पाणी पुरवठा कर वसुली काऊंटर व दैनंदिन आवक जावक, माहिती अधिकार नगरसेवकांच्या पत्रांना उत्तर, लोकशाही दिन पत्रांना उत्तरे इत्यादी काम केले जाते. ई-गव्हर्नन्स कामी कर आकारणी मॉड्युल, पाणी पुरवठा मॉड्युल, जन्म मृत्यु मॉड्युल व परवाना विभाग मॉड्युल, नागरी सुविधा केंद्र मॉड्युल, एस.एम.एस. ॲप्लीकेशन, संगणक खरेदी, वायरलेस सेट, लॅन, वॅन कनेक्टीव्हीटी, ई-मेल, मिरा भाईंदर महानगरपालिका वेबसाईट अद्यावत, वार्षिक संगणक संच देखभाल व दुरुस्ती, सर्वर होस्टींग, आर.टी.एस. सर्विसेस आपले सरकार, पी.जी. पोर्टल, वी.एम.एस. सीटी, वाय फाय सेवा इत्यादी महत्वाची कामे पार पाडताना इतर विभागाकडून आलेली पत्रे, त्याच्या समस्या, दुरुस्त्या व शासनाकडून प्राप्त परिपत्रक याबाबत कार्यवाही केली जाते.</td></tr>
<tr><td>क) पालिकेचे सांकेतिक स्थळ कोणते व ते अपडेट आहे का?</td><td></td><td>WWW.mbmc.gov.in विभागाकडून प्राप्त माहिती नियमित अपडेट करण्यात येते.</td></tr>
<tr><td>ड) या स्थळावर कोणकोणती माहिती दिली जाते?</td><td></td><td>महापालिका क्षेत्रातील विविध विभागाकडून प्रसिध्द करणेकरीता संगणक विभागाकडे देण्यात आलेली माहिती</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | संकेतस्थळावर आहे. |
| इ) पालिकेचे सांकेतिक स्थळ अपडेट नसेल तर याला जबाबदार कोण? त्याच्यावर कोणती कार्यवाही अपेक्षित आहे? | | माहिती उपलब्ध न करणारा मनपा विभाग. |
| ई) पालिकेने आतापर्यंत या विभागावर कारवाई केली आहे का? असल्यास कोणती? | | मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांनी त्यांच्याकडील माहिती संकेतस्थळावर अपडेट करणेकरीता विभागांना पत्रव्यवहार करण्यात येतो. |
| ७. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १२/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील ५ वर्षापासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली असून प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत अनधिकृत बांधकामांच्या माहितीबाबत नियमानुसार ठेवण्यात येणारी नोंदवही ठेवण्यात आली आहे काय? | | **प्रत्येक प्रभाग निहाय नोंदवही ठेवण्यात आली आहे.** |
| अ) सदर नोंदवहीचा नमुना महाराष्ट्र लेखा संहितानुसार अथवा कोणत्या कायद्यानुसार ठेवण्यात येतो? | | |
| ब) मागील ५ वर्षात आढळून आलेल्या प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी, सदर बांधकामांना देण्यात आलेल्या नोटीसीची माहिती, बांधकामांवर केलेली कारवाई, न्यायालयीन स्थगीती, लेखी कथन याबाबतची माहिती मा. महासभेसमोर उपलब्ध करुन देण्यात यावी. | | **मागील ५ वर्षातील माहिती**<br>**प्रभाग क्र. १**<br>**निदर्शनास आलेली बांधकामे - २४०**<br>**निष्कासीत केलेली बांधकामे - २३१**<br>**प्रभाग क्र. २**<br>**निदर्शनास आलेली बांधकामे - ४८**<br>**निष्कासीत केलेली बांधकामे - ३३**<br>**प्रभाग क्र. ०३**<br>**निदर्शनास आलेली बांधकामे - ५२**<br>**निष्कासीत केलेली बांधकामे - ३१**<br>**प्रभाग क्र. ०४**<br>**निदर्शनास आलेली बांधकामे - ११५**<br>**निष्कासीत केलेली बांधकामे - ५६**<br>**प्रभाग क्र. ०५**<br>**निदर्शनास आलेली बांधकामे - १५८**<br>**निष्कासीत केलेली बांधकामे - ११४**<br>**प्रभाग क्र. ०६**<br>**निदर्शनास आलेली बांधकामे -**<br>**निष्कासीत केलेली बांधकामे – २०००** |
| क) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत कोणत्या | | --- |

<table>
<tr><td>कायद्यानुसार व कोणती कारवाई होऊ शकते? याबाबता तपशिल आजपर्यंत नदनिर्देशित अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशिल देण्यात यावा.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>८. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १२/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) सन २०११ पासून मा. न्यायालयात दावा दाखल केलेल्या प्रकरणांवर सद्यस्थितीत काय कार्यवाही प्रस्तावित आहेत?</td><td></td><td>सन २०११ पासुन आजातागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यासंदर्भात महानगरपालिकेविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरणांपैकी निकाली निघालेल्या प्रकरणांमधील आदेश वेळोवेळी पुढील कार्यवाहीस्तव संबंधित विभागास कळविण्यात आलेले आहेत. तसेच प्रलंबित प्रकरणांमध्ये माहिती व कागदपत्रे मिळणेकरीता संबंधित विभागांस पत्र देण्यात आलेले असुन माहिती व कागदपत्रे प्राप्त झालेल्या बहुतांशी न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये महानगरपालिकेच्यावतीने लेखी कथन दाखल करण्यात आलेले आहे.</td></tr>
<tr><td>अ) ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाची स्थगिती समाप्त झाली आहे अशा किती व कोणत्या प्रकरणांवर कारवाई करण्याबाबत प्रभाग अधिकारी व विभागप्रमुख यांना दिलेल्या पत्रांची छायांकित प्रत देण्यात यावी व आकडेवारी नमुद करावी.</td><td></td><td>सन २०११ पासुन आजातागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यासंदर्भात प्राप्त न्यायप्रविष्ठ प्रकरणांची खालील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे आकडेवारी देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वर्ष</th><th>मा. न्यायालय</th><th>निकाली</th><th>प्रलंबित</th><th>एकुण</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">सन २०११</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>६५</td><td>२६</td><td>९१</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>१२</td><td>२</td><td>१४</td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">सन २०१२</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>८२</td><td>५२</td><td>१३४</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>२१</td><td>३</td><td>२४</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">सन २०१३</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>२६</td><td>४४</td><td>७०</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>३१</td><td>६</td><td>३७</td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">सन २०१४</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>२१</td><td>८०</td><td>१०१</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>२४</td><td>११</td><td>१३</td></tr>
<tr><td rowspan="2">५</td><td rowspan="2">सन २०१५</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>११</td><td>८२</td><td>९३</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>९</td><td>२२</td><td>३१</td></tr>
<tr><td rowspan="2">६</td><td rowspan="2">सन २०१६</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>४९</td><td>२</td><td>५१</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>२६</td><td>१५</td><td>४१</td></tr>
<tr><td rowspan="2">७</td><td rowspan="2">सन २०१७</td><td>मा. न्यायालय, ठाणे</td><td>११८</td><td>१</td><td>११९</td></tr>
<tr><td>मा. उच्च न्यायालय, मुंबई</td><td>२१</td><td>५</td><td>२६</td></tr>
</table>
वरीलप्रमाणे निकाली निघालेल्या प्रकरणांमधील आदेश वेळोवेळी पुढील कार्यवाहीस्तव संबंधित विभागास कळविण्यात आलेले असुन आदेश कळविणेबाबतच्या इकडील विभागाच्या पत्रांच्या छायांकित प्रती संकलित करण्याचे काम सुरु असुन सदरच्या प्रती संकलित झाल्या असता त्वरीत आपणास उपलब्ध करुन देण्यात येतील.</td></tr>
</table>

<table>
<tr><td>ब) सन २०११ पासून आतापर्यंत मनपा विरोधात निकाल लागलेल्या प्रकरणांमधील किती व कोणकोणत्या प्रकरणांमध्ये अपील करण्यात आले व कोणत्या प्रकरणात अपील केले नाही याची माहिती देण्यात यावी.</td><td></td><td>सन २०११ ते आजतागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यासंदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेविरुध्द तसेच महानगरपालिकेच्यावतीने मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दाखल करण्यत आलेल्या अपीलांची वर्षनिहाय सविस्तर माहितीची सद्यस्थितीसह नोंद असलेली यादी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>क) सन २०११ पासून मा. न्यायालयात घेतलेली स्थगीती किती प्रकरणांवर त्वरीत उठविण्यात आली?</td><td></td><td>सन २०११ ते आजतागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यासंदर्भात मनपाविरुद दाखल दावे/याचिका यांची जैसे-थे आदेश असल्यास अथवा जैसे-थे आदेश नसल्यास तशी नोंद असलेली सविस्तर नोंद असलेली यादी सोबत उपलबध करुन देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>ड) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर कामचूकार, कामामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा किंवा विरोधकांना मदत केल्यास कोणत्या कायद्यानुसार कोणती कारवाई होऊ शकते?</td><td></td><td>शासकिय अधिकारी/कर्मचारी यांनी कर्तव्यात कसुर केल्यास, कामात दिरंगाई व हलगर्जीपणा केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३९७ अ (२) अन्वये कार्यवाही होऊ शकते.</td></tr>
<tr><td>९. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. १४/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) मनपा क्षेत्रात किती ठिकाणी बाजार फी वसुल केली जाते?</td><td></td><td>महानगरपालिका हद्दीत १) भाईंदर पश्चिम २) भाईंदर पूर्व ३) मिरारोड ते चेणा ४) मुर्धा ते उत्तन असे ४ ठिकाणी बाजार वसुली करण्यात येते.</td></tr>
<tr><td>अ) सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ किती अंदाजित रक्कम मनपा अर्थसंकल्पामध्ये दाखविण्यात आली होती? त्यातील वर्षनिहाय किती वसुल झाली?</td><td></td><td>(आकडे लाखात)
<table>
<tr><th>सन</th><th>अर्थसंकल्प रक्कम</th><th>वसुल रक्कम</th></tr>
<tr><td>२०१५-१६</td><td>८५०.००</td><td>५४३.७२</td></tr>
<tr><td>२०१६-१७</td><td>६५०.००</td><td>६१४.७४</td></tr>
<tr><td>२०१७-१८</td><td>७००.००</td><td>६६५.९५</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>ब) या प्रत्येक ठिकाणचे सन २०१७-१८ चे ठेकेदार कोण आहेत?</td><td></td><td>
<table>
<tr><th>विभाग</th><th>ठेकेदाराचे नांव</th></tr>
<tr><td>भाईंदर पूर्व</td><td>श्री. अमरसिंग जाधव</td></tr>
<tr><td>भाईंदर पश्चिम</td><td>श्री. अमरसिंग जाधव</td></tr>
<tr><td>मिरारोड ते चेणा</td><td>श्री. हफीजउल्ला एच. खान</td></tr>
<tr><td>मुर्धा ते उत्तन</td><td>श्री गजानन एंटरप्रायजेस</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>क) सन २०१७-१८ साठी प्रत्येक बाजारासाठी किती बँक गॅरंटी ठरविण्यात आली होती व कोणी किती जमा केली?</td><td></td><td>
<table>
<tr><th>विभाग</th><th>देकार रक्कम</th><th>सुरक्षा अनामत रक्कम<br>(देकार रक्कमेच्या १५%)</th></tr>
<tr><td>भाईंदर पूर्व</td><td>२११९०५५९</td><td>रु. ३१७८५८४</td></tr>
<tr><td>भाईंदर पश्चिम</td><td>२२३४२१००</td><td>रु. ३३५१३१५</td></tr>
<tr><td>मिरारोड ते चेणा</td><td>२२२७२३५४</td><td>रु. ३३२९६००</td></tr>
<tr><td>मुर्धा ते उत्तन</td><td>१२९७०९३</td><td>रु. १९४५६४</td></tr>
</table></td></tr>
</table>

<table>
<tr><td>ड) मनपाला मार्च २०१७ अखेर निविदेत ठरविल्याप्रमाणे किती बाजार फी शुल्क येणे आहे व कोणाकडून?</td><td></td><td><table><tr><th>ठेकेदाराचे नांव</th><th>वर्ष</th><th>प्रलंबित वसुली रक्कम</th></tr><tr><td>मे. एकविरा एजन्सी</td><td>२०१४-१५</td><td>१५८४३२३२</td></tr><tr><td>मे. सिमरन इंटरप्रायजेस</td><td>२०१४-१५</td><td>९७७५२०६</td></tr><tr><td>श्री. अब्दुल खान</td><td>२०१४-१५</td><td>४४८२८३</td></tr></table></td></tr>
<tr><td>इ) मार्च २०१७ अखेर पर्यंत डिफॉल्डर ठेकेकदार कोण आहेत व मनपाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली?</td><td></td><td>वरील अ.क्र. ५ मध्ये दर्शविलेले नमुद ठेकेदार डिफॉल्डर असून त्यांचे विरुध्द डिसेंबर २०१५ मध्ये मा. न्यायालयात सेक्शन १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १८८१ नुसार फौजदारी गुन्हा दाखल झालेला असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.</td></tr>
</table>

(**बी. जी. पवार**)
आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**